# सिद्धयोगी श्रीगजानन महाराज

रघुराज मेटकरी

मा. शिक्षणमहर्षी पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील साहेब,
माजी राज्यपाल व मा. शिक्षणतज्ज्ञ डॉ. शिवाजीराव कदम सर
कुलगुरु भारती विद्यापीठ, पुणे यांना...

## मनोगत...

या मराठी मातीत अनेक थोर महात्मे जन्माला आले. वीर, साधू-संन्यासीही जन्मले. आपल्या आयुष्याच्या प्रकाशात सामान्य माणसांना वाट दाखवायचे सामर्थ्य त्यांच्यात होते म्हणूनच ते अजरामर झाले. शूराचा पराक्रम लोक विसरत नाहीत तसेच संतांचे श्रेष्ठत्वही लोक मनामनात सांभाळून ठेवतात.

मानवाच्या मनात संत हा एक आनंदाचा आणि नवी स्फूर्ती देणारा विषय आहे. इथे खरे संत आणि ढोंगी संत यावर वाद-विवादाचे प्रसंग नेहमीच उभे राहिले आहेत. या विषयावर अनेक साधकबाधक चर्चा झालेल्या आहेत. संत तुकाराम महाराज म्हणतात,

'ऐसे कैसे झाले भोंदू। कर्म करोनि म्हणति साधू।
अंगा लावूनिया राख। डोळे झाकुनि करिती पाप।
दावुनि वैराग्याची कळा। भोगी विषयांचा सोहळा।
तुका म्हणे सांगो किती। जळो तयांची संगती।।'

पण मानवाने ढोंगी संतांना कायमपणे खड्यासारखे बाजूला ठेवून खऱ्या संतांची ओळख जपली आहे. आजकाल तर सर्वसामान्य माणसापासून विद्वानांपर्यंत संतांचे आकर्षण वाढताना दिसत आहे. समाजातील सर्व थरांतील लोकांना आपल्याकडे खेचून घेण्याचे आगळेवेगळे सामर्थ्य संतांच्या ठिकाणी असते हे निर्विवाद सत्य आहे.

संत-महात्म्यांनी त्यांच्या आयुष्यात चमत्कार केले असतील किंवा नसतील. पण शतकानुशतके माणसाला भावनिक आणि वैचारिक आधार देण्याचे काम त्यांनी निश्चित केलेले आहे. संतांनी प्रेमाचा, भक्तीचा, मानवतेचा आणि समतेचा संदेश स्वत:च्या जीवनातून लोकांना दिलेला आहे. महाराष्ट्राच्या या मातीत अध्यात्माचे आणि सुविचारांचे पीक जोपासण्याचा प्रयत्न संतांनी केलेला आहे.

समाजात सर्व क्षेत्रात चाललेला व्यभिचार सर्वसामान्यांना दिसत असतो. कळत असतो. तो पाहून त्यांचे मन व्यथितही होत असते. त्यांचा अंतरात्मा आक्रंदन करीत असतो. सर्वसामान्यांनी वेद आणि पुराण वाचलेले नसते. आगमानिगमाचा भेद कसा असतो हे त्यांना कळलेले नसते, शास्त्राचा वाद-संवाद त्यांनी समजून